# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,नागपूर.
शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.
E-mail: ronagpur.dte@gmail.com Web:- rdtenagpur.org.in
दुरध्वनी क्र.२५६५१४३ फॅक्स क्रं. ०७१२–२५६१६६३

क्र :–तंशिस/विकाना/पदविका /ए.आर.सी./२०१४/ 3732
दि. - 6 DEC 2014

प्रति,
प्राचार्य,
संबंधित एआरसी केंद्र.
नागपूर विभाग,

विषय:– शैक्षणिक वर्ष २०१४–१५ मधील प्रथम वर्ष/द्वितिय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रवेश अर्ज विक्रीची रक्कम संचालनालयास या कार्यालयामार्फत जमा करण्यांबाबत. .

संदर्भ:– १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/पदविका/एआरसी/२०१४/९८५, दि. ०७/१०/२०१४.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/विकाना/पदविका/एआरसी/२०१४/३२६८, दि. १९/१०/२०१४

उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व एआरसी केंद्राना कळविण्यांत आले होते की , सर्व एआरसी केंद्रानी शैक्षणिक वर्ष २०१४–१५ मधील प्रथम वर्ष /द्वितिय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रवेश अर्ज विक्रीच्या रक्कमेचा धनाकर्ष संचालनालयास सादर करण्यांकरिता या कार्यालयात हिशोब सादर करावा. परंतू अद्यापही काही एआरसी केंद्रानी प्रवेश अर्ज विक्रीचा हिशोब या कार्यालयास सादर केला नाही.

ज्या एआरसी केंद्रानी अद्यापही शैक्षणिक वर्ष २०१४–२०१५ मधील प्रथम वर्ष/द्वितिय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्ज विक्रीचा हिशोब सादर केला नाही, त्यांनी दि. ९/१२/२०१४ पर्यत धनाकर्ष पूर्ण हिशोबासह या कार्यालयात जमा करावा, अन्यथा अशा संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१५–२०१६ मध्ये एआरसी केंद्र देण्यांबाबत या कार्यालयाकडून शिफारस केली जाणार नाही.

ज्या एआरसी केंद्राचा हिशोब वरिल नमूद तारखेस प्राप्त होणार नाही, त्या संस्थेच्या शैक्षणिक वर्ष २०१४–२०१५ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी या कार्यालयाकडून प्रमाणित केली जाणार नाही. याची संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर